स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२३–२४/५३९ दि. २७/१२/२०२३

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : बालविवाह थांबविण्यासाठी विशेष शिबिरांमधून जनजागृती करण्याबाबत

महोदय,

मा. राज्य संपर्क अधिकारी, रासेयो कक्ष, मंत्रालय, मुंबई यांच्या पत्रानुसार महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांमध्ये बाल विवाह थांबविण्यासाठी विशेष शिबिरांमधून जनजागृती करण्यात यावी, असे कळविण्यात आले आहे.

त्यानुसार प्रामुख्याने यामध्ये नाशिक जिल्ह्याचा उल्लेख आहे. तरी या उपक्रमामध्ये सर्व जिल्ह्यांनी योगदान देऊन आपल्या महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या सात दिवसीय निवासी शिबिरांसाठी निवडलेल्या गावांमध्ये बालविवाह थांबविण्यासाठी रासेयो स्वयंसेवकांकडून पथनाट्य, भारूड, एकांकिका असे जनजागृतीपर आधारीत उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे. सदर उपक्रम प्रभाविपणे राबवून या उपक्रमाचा सविस्तर अहवाल व छायाचित्रे nss_student_list@pun.unipune.acin या मेलवर पाठवावा. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : मा. राज्य संपर्क अधिकारी, रासेयो कक्ष, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र

मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार इमारत, दालन क्र. ४१६,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.

ई -मेल-nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र२२६७९५६५-०२२.

क्रमांक:रासेयो-२०२३/प्र.क्र.२२७ /रासेयो कक्ष दिनांक : **29** डिसेंबर, २०२३

प्रति,

कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,
सर्व रासेयो संचलित विद्यापीठे संचालनालये

विषय: महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांमध्ये बालविवाह थांबविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनांचे सहकार्य मिळणेबाबत.

संदर्भ: महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्र.बालवि-२०२३/प्र.क्र.१/का-९ (शिकाना), दिनांक १८ डिसेंबर, २०२३

उपरोक्त विषयास अनुलक्षून महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय व युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर, बीड, हिंगोली, जालना, लातूर, नांदेड, धाराशिव, परभणी, नाशिक, जळगांव, धुळे व सोलापूर या १२ जिल्ह्यांमध्ये बाल विवाह थांबविण्यासाठी विषेश कृती दल स्थापन करण्यात आले असून सदर कृती दल जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत आहे.

त्यानुषंगाने महाराष्ट्रातील वरील १२ जिल्ह्यातील विद्यापीठे/संचालनालये अंतर्गत महाविद्यालयांकडून आयोजित करण्यात आलेल्या सात दिवसीय निवासी शिबिरांसाठी निवडलेल्या गांवात किंवा रासेयोने दत्तक घेतलेल्या गांवात बालविवाह थांबविण्यासाठी, या विषयी जनजागृती करण्यासाठी विषेश मोहिमेचे आयोजन करण्यात यावे. या मोहिमेत पथनाट्य, भारुड, एकांकिका इ. उपक्रमाचा समावेश करण्यात यावा. बाल विवाह प्रथा समाप्त करण्याच्या सामायिक उद्दिष्टांसाठी रासेयोकडून एक पूरक वातावरण तयार करण्यात यावे.

विद्यापीठे/संचालनालये यांनी बाल विवाह थांबविण्यासाठी ज्या विषेश मोहिमेचे आयोजन केले आहे. त्याबाबतचा सविस्तर अहवाल क्षेत्रिय संचालक, रासेयो क्षेत्रिय संचालनालय, पुणे यांना व या कार्यालयास पाठविण्यात यावा. तसेच निवासी शिबिरांमध्ये एक दिवसीय बालविवाह थांबविण्याबाबतचे

बौध्दिक सत्र घेण्यास महिला व बालविभागाचे अधिकारी/कर्मचारी, युनिसेफ आणि सेंटर फॉर सोशल अँड बिहेवियर चेंज (SBC-३) ही संस्था या १२ जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेस संपूर्ण सहकार्य करणार आहे.

**( डॉ. निलेश मो. पाठक )**
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी

**प्रत: माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.**

१. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
२. सचिव, महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
३. क्षेत्रिय संचालक, रासेयो क्षेत्रिय संचालनालय, पुणे

मंत्रालयीन सेवा
महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शिबीर कार्यालय नवीन हैद्राबाद हाऊस ,
३ रा मजला सिव्हिल लाईन ,
नागपूर.
Email ID: desk९.wcd-mh@mah.gov.in

क्रमांक :बालवि-२०२३/प्र.क्र.१/का-९ (शिबाका) दि.१८ डिसेंबर, २०२३

प्रति,
प्रधान सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई.

विषय:-महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यामध्ये बाल विवाह थांबवण्यासाठी राष्ट्रीय सेवायोजनेचे सहकार्य मिळणेबाबत.

संदर्भ:- श्रीम.अल्पा वोरा, प्रतिनिधी युनिसेफ यांचा दि.१४/१२/२०२३ रोजीचा ईमेल संदेश.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये महिला आणि बाल विकास विभाग, छत्रपती संभाजीनगर, बीड, हिंगोली, जालना, लातूर, नांदेड, धाराशिव, परभणी, नाशिक, जळगाव, धुळे आणि सोलापूर या १२ जिल्ह्यांमध्ये बाल विवाह थांबवण्यासाठी विशेष काम करत आहे.

सक्षम या योजने अंतर्गत यूनिसेफ व महिला व बाल विकास विभाग आणि जिल्हा कृती दला द्वारे तयार केलेल्या जिल्हा कृती आराखड्याची अंमलबजावणी करण्याकरिता प्रायोगिक तत्वावर १२ जिल्ह्यांमध्ये बाल विवाह थांबवण्यासाठी जिल्हा कृती दल स्थापन केले आहे. सदर जिल्हा कृती दल हे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली काम करत असून त्यात प्रकल्प अधिकारी, आदिवासी प्रकल्प, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महिला व बाल विकास, जिल्हा परिषद (सदस्य सचिव), जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा शिक्षणाधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी ग्राम पंचायत, पोलीस अधीक्षक, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी व चाइल्ड लाइन १०९८ चे अधिकारी इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे. या व्यतिरिक्त जिल्हाधिकारी इतर सेवाभावी संस्था सदस्यांची जिल्हा कृतीदलामध्ये नेमणूक करू शकतात.

सदरील उपक्रमांचा एक भाग म्हणून, युवा मंचांद्वारे सक्षम युवा शक्ती दिवस साजरा करण्याचा मानस आहे. त्याद्वारे बाल विवाह थांबवण्यासाठी व जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि समुदायांना संवेदनशील बनवण्यात लक्षणीय प्रगती करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना (NSS) महत्वाची भूमिका बजावू शकते.

NSS च्या विशाल नेटवर्कमध्ये आणि समर्पित युवा स्वयंसेवकांमध्ये, मोठ्या प्रमाणात लोकांपर्यंत

आहे. NSS स्वयंसेवक समाजातील तरुण, मुले आणि पालकांना संवेदनशील वनविण्यात, बालविवाह प्रथा समाप्त करण्याच्या सामायिक उद्दिष्टासाठी एक सहाय्यक वातावरण तयार करण्यात सक्रियपणे काम करू शकतात.

राष्ट्रीय सेवा योजना (NSS) या वतीने डिसेंबर व जानेवारीमध्ये सात दिवसीय विशेष निवासी शिविरे निवडलेल्या गावांमध्ये आयोजित केली जातात. या सात दिवसीय निवासी शिबिरांमधील एक दिवस बालविवाह थांबण्यासाठी जनजागृती करण्यासाठी समर्पित केल्यास बाल विवाहाच्या सामाजिक समस्येचे उच्चाटन करण्यास निश्चित हातभार लागेल.

करिता आपणास विनंती करण्यात येते की राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या सात दिवसीय विशेष निवासी शिबिरांमधील एक दिवस वरील १२ जिल्ह्यातील गावांमध्ये बालविवाह थांबविण्यासाठी जनजागृती करण्यासाठी समर्पित करण्याबाबत आपल्या स्तरावरून राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व संचालक आणि कार्यक्रम अधिकारी यांना कळवावे, जेणे करून बाल विवाहासारखी अनिष्ट प्रथा संपवण्यास निश्चितच हातभार लागेल.

निवासी शिबिरांमधील एक दिवस बालविवाह थांबण्याबाबतचे बौद्धिक सत्र घेण्यास महिला व बाल विभागाचे अधिकारी / कर्मचारी, यूनिसेफ आणि सेंटर फॉर सोशल अँड बिहेवियर चेंज (SBC-३) ही सेवाभावी संस्था या १२ जिल्ह्यांमध्ये पूर्ण सहकार्य करतील.

करीता महिला व बाल विभागाच्या बालविवाह मुक्त महाराष्ट्र या उद्देशाच्या पूर्ततेसाठी आपण सहकार्य करावे हि विनंती.

डॉ. अनुप कुमार यादव
(भा.प्र.से.),
सचिव,
महिला व बाल विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई.

प्रत-माहितीस्तव

१) आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) श्री. अजय शिंदे, विभागीय संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, विभागीय संचालनालय, महाराष्ट्र आणि गोवा, पुणे.
३) डॉ. निलेश पाठक, विशेष कार्य अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**Sachin**

| | |
|---|---|
| **From:** | Alpa Krishnadas Vora <akvora@unicef.org> |
| **Sent:** | 14 December 2023 14:40 |
| **To:** | psec.wcd@maharashtra.gov.in; psec wchd |
| **Cc:** | commissionerwcdpune@gmail.com; MSCPS STATE1; Swati Mohapatra; Sachin |
| **Subject:** | Request for NSS Support in Ending Child Marriage Programs in 12 districts |

Dr Anup Yadav
Secretary, DWCD
Government of Maharashtra.

Dear Dr Yadav,

I hope this letter finds you well.

As you are aware the Ending Child Marriage Initiatives are ongoing in the 12 districts (Aurangabad, Beed, Hingoli, Jalna, Latur, Nanded, Osmanabad, Parbhani, Nashik, Jalgaon, Dhule and Sholapur) of Maharashtra.

UNICEF, our partner Centre for Social and Behaviour Change Communication have been working closely with DWCD and District Collectors, in mobilization of youth platforms in creating awareness and sensitizing communities across 12 districts of Maharashtra for Ending Child Marriage.

In this regard and in discussion with Regional Director of NSS, we wanted to request your kind support to reach out Principal Secretary, Department of Higher & Technical Education for their collaboration. More specifically, we would like NSS to dedicate one day during the NSS special camps that are underway in these 12 districts, so that the NSS could join the initiatives for child marriage awareness in the districts.

The NSS, with its vast network and dedicated youth volunteers, holds the potential to play a crucial role in reaching out to a wider audience and making a lasting impression on the community. The NSS coordinators can reach out to DWCDO/DCPU, UNICEF and our partner SBC3 for orientation and any other support for roll out.

The letter is required to be sent to:
Shri. Vikas Chandra Rastogi
Principal Secretary,
Department of Higher & Technical Education,
Government of Maharashtra, Mumbai.
psec.higheredu@maharashtra.gov.in

Cc: Shri. Ajay Shinde
Regional Director (Maharashtra & Goa)
Regional Directorate of N.S.S. – PUNE.
nssrcpune@gmail.com

Dr. Nilesh Pathak
State Liaison Officer,
NSS, Mantralay, Maharashtra
nssmantralaya@gmail.com